महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

सत्यमेव जयते



महाराष्ट्र शासन

पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे

खारकर आळी, कळवा ब्रीज जवळ,ठाणे पश्चिम-४००६०१

(आस्थापना शाखा)

ई-मेल - cp.thane.sheetbr@mahapolice.gov.in

जा.क्र.ठाआ/आस्था-२(२)/ २२ /२०२६ ठाणे दि.०२/०१/२०२६

संदर्भ :- शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग क्र.एस.आर.व्ही.-
२०११/प्र.क्र.२८४/२०१२,दि.२१/१०/२०११

विषय :- पोलीस आयुक्त,ठाणे शहर आयुक्तालयाचे आस्थापनेवरील पोलीस अंमलदारांची सामायीक जेष्ठतासुची प्रसिध्द करणेबाबत..

-----oooo-----

आदेश

पोलीस आयुक्त,ठाणे शहर आस्थापनेवरील सहा.पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांची दि.०१/०१/२०२६ ची तात्पुरती (PROVISIONAL) जेष्ठतासुची यासोबत प्रसिध्द करण्यात येत असून ती ठाणे पोलीस आयुक्तालयाचे www.thanepolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तरी सर्व प्रभारी अधिकारी यांनी सदरची तात्पुरती ज्येष्ठतासुची सर्व संबधीत पोलीस अंमलदारांच्या निर्देशनास आणून द्यावी. ज्येष्ठतासुचीमध्ये त्यांच्या नांवासमोर असलेल्या रकान्यातील सर्व माहिती (नांव,बक्कल नंबर, जन्म तारीख, भरती दिनांक, पदोन्नती दिनांक, जात,प्रवर्ग इत्यादी) माहिती पडताळून पाहून, सदर ज्येष्ठतासुचीमध्ये काही दुरुस्ती असल्यास आवश्यक त्या पुराव्यासह त्यांची अभिवेदने संबधीत पोलीस उप आयुक्त कार्यालयाचे मार्फतीने दि.०१/०२/२०२६ पर्यंत या कार्यालयात पाठवावी. पोलीस उप आयुक्त कार्यालयाने पोलीस अंमलदारांचे सेवाज्येष्ठता यादीतील दुरुस्तीसाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची त्यांचे सेवापटावरुन पडताळणी करुन दुरुस्तीबाबत स्पष्ट अभिप्रायासह सदरचे अर्ज त्वरेने या कार्यालयास पाठवावे.

तसेच प्रभारी अधिकारी यांनी तात्पुरत्या (PROVISIONAL) जेष्ठता यादीचे अवलोकन करुन खालील प्रमाणे कार्यवाही करुन माहिती सादर करावी.

१. मागासप्रवर्गात मोडणा-या सर्व अंमलदारांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर करणेबाबत यापूर्वी वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तरीही अद्याप ज्या मागासवर्गीय पोलीस अंमलदारांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत, त्यांना तात्काळ जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्याची लेखी समज देण्यात यावी.

२. इतर मागास प्रवर्गातील उमेदवार आरक्षणाचा फायदा घेवून सेवेत दाखल झाले असतील तर अशा सर्व अंमलदारांना जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती या कार्यालयात सादर कराव्यात. जर त्यांची नियुक्ती खुल्या प्रवर्गातून झाली असेल, आणि त्यांनी इतर मागास प्रर्वगातील आरक्षणाचे कोणतेही लाभ घेतले नसतील अशा कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवर्गात दर्शविण्याकरिता त्यांची देखील माहिती सादर करावी.

३. ज्या अंमलदारांना निलंबित केले असेल, किंवा ते शिक्षा भोगत असतील अशा अंमलदारांची माहिती सादर करावी.

४. ज्या पोलीस अंमलदारांनी यापूर्वी नियमित पदोन्नती नाकारली आहे, त्यांचीही माहिती पाठवावी.

वरील प्रमाणे सर्व माहिती दि.०१/०२/२०२६ पर्यंत या कार्यालयास सादर करावी. त्यानंतर अंतिम सेवाज्येष्ठता यादी नियमित करण्यात येईल व त्यानंतर कोणतेही आक्षेप/बदलाचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(डॉ.श्रीकांत परोपकारी)
पोलीस उप आयुक्त,मुख्या.१
पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे शहर

प्रति,

पोलीस उप आयुक्त, परि–१ ठाणे, परि–२ भिवंडी, परि–३ कल्याण,
परि–४ उल्हासनगर, परि–५ वा.ई., शवाशा ठाणे/ गुन्हे शाखा/ वि.शा. ठाणे,
रा.पो.नि. मुख्यालय ठाणे/ पो.नि. मोपशा ठाणे/सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी
आयुक्तालय ठाणे शहर / सर्व नि.कक्ष.प्रभारी अधिकारी ठाणे शहर/सर्व अप्रवि प्रभारी
अधिकारी ठाणे शहर.

प्रत

प्रभारी अधिकारी, अभियांत्रिकी कक्ष, ठाणे शहर

२/. सोबतची सहा.पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई संवर्गातील पोलीस अंमलदारांच्या जेष्ठता याद्या ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे संकेत स्थळावर प्रसिध्दी कराव्यात.

प्रत :–

१ सर्व (पोलीस घटक प्रसिध्दीसाठी)